महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/Mou ECI-MoE/२०२४/ई-ऑफीस प्रणालीद्वारे

**परिपत्रक:**

**प्रति,**
**संचालक/प्राचार्य,**
**सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित**
**तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,**
**पुणे विभाग.**

विषय : Implementation of MoU signed between the MoE and ECI for greater electoral participation.
संदर्भ : १) मुख्य निवडणुक अधिकारी कार्यालय महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, यांचे पत्र दि. ०७.०२.२०२४.
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दि. १२.०२.२०२४.

मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागाच्या विविध पैलूंना प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक संस्थांचे महत्व अधिक आहे. याकरिता भारत निवडणूक आयोगाने शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. सदर कराराच्या तरतूदीची अंमलबजावणी करण्याकरिता भारत निवडणूक आयोगाने प्रचार साहीत्य, मतदार प्रतिज्ञा, व्हिडीओ, गाण, माहितीपत्रिका, वोटर गाईड सेल्फी पॉईट साहित्य, विविध साहीत्य पुढील गुगल लिंकवर उपलब्ध करुन दिलेले आहे.

**https://drive.google.com/drive/folders/199911kTcwINSZpDdDqI8sCaSAxyKRukw?usp=sharing**

सदर गुगल लिंक तसेच त्यावरील प्रचार साहित्य आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देऊन त्यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात याव्यात.

१. शैक्षणिक संस्थांनी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी प्रचार साहीत्य त्यांच्या विविध समाज माध्यमांवर अपलोड कराव्यात. तसेच आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना कंन्टेन्ट / रिल्स / शॉर्ट व्हिडीओ / कविता तयार करण्याबाबत प्रोत्साहन देण्यात यावे.
२. महाविद्यालय / विद्यापीठ मध्ये सेमीनार घेऊन निवडणूक प्रक्रीया विषयी माहिती देण्यात यावी. सदर सेमीनारचे व्हिडीओ व फोटो वेबसाईट तसेच समाज माध्यम यावर #ChunavKaParvDeshKaGarv व #IVoteforSure या हॅशटॅगसह प्रसिध्दी करावी.
३. महाविद्यालयाच्या फेस्टीवल, उपक्रम व वार्षिक कार्यक्रमामध्ये माहिती व प्रोत्साहनात्मक व्हिडीओ, फिल्म व गाणे दाखविण्यात यावे. तसेच सदर कार्यक्रमामध्ये माहिती व प्रोत्साहनात्मक व्हिडीओ, फिल्म व गाणे विद्यार्थ्यांच्या व्हॉट्स ॲप ग्रुपवर पाठविण्यात यावे.
४. संस्थांनी राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धा करण्यात यावी. सदर स्पर्धा I Vote for Sure या थिमवर प्रश्न मंजुषा, चित्रकला, पेंटींग, स्लोगन अशा स्पर्धा राबविण्यात याव्यात. सदर स्पर्धेचे फोटो व व्हिडीओ महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या समाजमाध्यमांवर अपलोड करुन ते भारत निवडणूक आयोगाच्या समाज माध्यमांना टॅग करण्यात यावे.
५. मतदार प्रतिज्ञा महाविद्यालय फेस्टीवल, वार्षिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना देण्यात यावी.
६. सोल्फी पॉईटवर विद्यार्थ्यांनी काढलेली सेल्फी विद्यार्थ्यांच्या समाज माध्यमावर #ChunavKaParvDeshKaGarv या हॅशटॅगसह अपलोड करण्याबाबत प्रोत्साहन देण्यात यावे.
७. विद्यार्थ्यांच्या व्हॉट्स ॲप ग्रुप व समाज माध्यमांवर वोटर गाईड, कॉमिक बुक व निवडणूक संदर्भातील प्रचार साहीत्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

**Signed by Maruti Rajaram Jadhav**
**Date: 15-03-2024 17:16:15**
**Reason: Approved**

(मारुती रा. जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत:
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना - संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.